विशेष दिवाणी दावा क्र.०९/२०१७
गंगाधर वि. संभाजी
**प्रतिवादी क्रं. १ ते ५ तर्फे सा.क्र.१**
**(नि.क्र.४०७)**



**वादी तर्फे उलटतपास श्री. व्ही.एस.शेळके, वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

**५२.** हे खरे की, दावा दाखल करताना माझे वडील हयात होते. हे खरे की, या कामातील सर्व कागदपत्रे वेगवेगळया कार्यालयातून मी गोळा केली आहेत व दाखल केली आहेत. हे खरे नाही की, कैफीयत तयार करताना त्यातील माहिती मी दिली आहे. १९८८ ते २००८ या काळात आमच्याकडे बैल बारदाणा असल्याबाबत ग्रामपंचायतचे दाखले मला जर उपलब्ध झाले तर दाखल करतो. विद्युत मंडळाचा फार्म नं.ए-१ हा मी, माझे वडील किंवा भाऊ यांच्या नावे नाही. १९८८ ते २००८ या काळात विद्युत मोटार खरेदी केल्याबद्दल पावती मी दाखल करु शकेन. नांदेडहून अशी मोटार मी आणली, तिच्या खरेदीचे नेमके वर्ष मला आठवत नाही. ती ५ एच.पी.ची आहे. २००१ ते २००५-०६ या काळात या संपुर्ण वाद मिळकतीत डाळींब बाग होती, हे म्हणणे खरे आहे. या डाळींब बागेला किनगांव-कोपरा साठवण तलावातून डॉ. वारद यांच्या रानातून दोन पाईपलाईन होत्या यास माझे सांगणे की, त्या वादीच्या होत्या. संपुर्ण वाद मिळकत ७६ एकर आहे. या ७६ एकर क्षेत्रातील अंतराम डेपे या माझ्या आजोबाची विहीर कोरडी पडल्याचा पंचनामा झाला होता याची मला माहिती नाही. सन २००१ ते २००५ या काळात नदीकाठी वडिलोपार्जित एक व स.क्र.५ मध्ये लहान दुसरी विहिर होती, हे खरे आहे. मी सांगतो की, स.क्र.६ मध्ये सुध्दा विहिर आहे. हे खरे की, २००४ साली दुष्काळामुळे नदी, ओढे, विहिरी कोरडया झाल्या होत्या. किनगांव-कोपरा साठवण तलावातून दोन पाईपलाईनद्वारे येणारे पाणी सुध्दा जिल्हाधिकाऱ्यानी पाणी टंचाईमुळे बंद केले होते, ही बाब माझ्या लक्षात नाही. तरीही वादी क्र.१ वर त्याने ७६ एकर क्षेत्राला पाणी देण्यासाठी

विशेष दिवाणी दावा क्र.०९/२०१७
गंगाधर वि. संभाजी
**प्रतिवादी क्रं. १ ते ५ तर्फे सा.क्र.१**
**(नि.क्र.४०७)**



मोटारला चोरुन वीज जोडली असा गुन्हा दाखल झाला होता. वीज चोरीच्या गुन्हयात त्रास नको म्हणून वादीने तीन लाख रुपये वीज मंडळात दंड भरला याची मला माहिती नाही. हे खरे की, विशेष दिवाणी दावा क्र.०१/२००४ हा वारद यांनी वादीनी त्यांच्या रानातून पाईपलाईन काढल्याने नुकसान भरपाईसाठी दाखल केला असल्याचे मला माहित नाही. तो दावा नामंजूर झाल्यावर त्याविरुध्दचे अपील मंजूर झाले, हे मला माहित नाही. विशेष दरखास्त क्र.१४/२०२५ ही त्या अपीलाच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी या न्यायालयात प्रलंबित आहे, याबद्दल मला माहिती नाही. वारद यांनी वादीच्या मुनीमविरुध्द त्याने त्यांच्या क्षेत्रात अतिक्रमण केले म्हणून फौजदारी खटला केले असल्याचे मला माहित नाही. सदर तीन्ही दावे, खटले यांना सामोरे जाण्याचा त्रास निव्वळ डाळींब बाग वाचावी म्हणून वादीला झाल्याचे मला माहिती नाही.

**<u>उलटतपास विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**

दिनांक:१३/०८/२०२५. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.